**कालमर्यादा /महत्वाचे**

**क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१८/पोनि/०७/२०१८**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :-१२/०१/२०१८.

संदर्भ :- १) सन-२०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि. २५/०६/२०१४ व,
२) सन-२०१५ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०६/०४/२०१५.

विषय :- सार्वत्रिक बदल्या-२०१८ करिता माहिती पाठविण्याबाबत
(i) राखीव पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक
(ii) पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी / वाहतूक)/ (भांडारपाल/विजतंत्री), व
(iii) मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षक (तांत्रिक व नौका विभाग)
(iv) पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक आयुधिक

*** *** ***

**परिपत्रक:-**

राखीव पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने संदर्भाधिन अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

१) दि.३१/०५/२०१८ पर्यत, किंवा त्यापुर्वी राखीव पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश-२०१५) एके ठिकाणी ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल, त्या पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी, जेणेकरुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्याबाबतची प्रशासकीय कार्यवाही करता येईल.

२) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ दि.०६/०४/२०१५ मधील कलम २ (१४ अ-१) मध्ये महामार्ग वाहतुक व प्रशिक्षण संचालनालय या शब्दानंतर पोलीस बिनतारी संदेश विभाग व मोटार परिवहन विभाग,

फोर्स वन या शब्दाचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २०/११/२०१५ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अधिन राहून अधिनियम दि.०६/०४/२०१५ नुसार बदल्या करण्यात येतात.

३) **सर्वसाधारण बदल्या - २०१८ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात :**

**अ) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक**

**ब) विहीत कालवधी पूर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज, व**

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक**

**अ) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी :-**

दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत, किंवा त्यापुर्वी ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांना सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयात तीन वर्षांचा विहीत कालावधी पुर्ण झाला आहे, असे बदलीसपात्र पोलीस अधिकारी .

**ब) विहीत कालवधी पुर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज :-**

i. ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांनी सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्या पदावरुन व ठिकाणावरुन इतर ठिकाणी बदली हवी असेल, अशा अधिकाऱ्यांची त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह, व अशी बदली का पाहिजे याच्या सबळ कारणासह संबंधीत घटक प्रमुखांच्या शिफारशींसह त्वरेने माहिती पाठवावी.

ii. त्यांनी त्यांच्या बदलीसंदर्भात वारंवार विनंती अर्ज सादर न करता एकाच अर्जात त्यांची जी काही विनंतीची ठिकाणे असतील ती नमूद करुन सदरचा अर्ज संबंधीत घटक प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह ह्या कार्यालयास पाठवावेत.

iii. दि. ०१/०२/२०१८ पुर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज/ प्रतिकूल अहवाल इत्यादि या परिपत्राकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी :-**

राखीव पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक/पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या

कार्यालयाचे क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ व क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएन/३२८/२०१६, दिनांक ०८/११/२०१७ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

४) सर्वसाधारण बदल्या- २०१८ करिता खालीलप्रमाणे आराखडा निश्चित करण्यात आला आहे, त्याचे अनुपालन सर्वांनी करावे :

| कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|
| दिनांक १५/०१/२०१८ ते १५/०२/२०१८ | पोलीस घटकांनी पोलीस अधिकाऱ्यांचे विनंती अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. तसेच, विहीत कालावधी पूर्ण झालेल्या बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांची माहिती तयार करावी |
| दिनांक १६/०२/२०१८ | सर्व माहिती पो.म.सं. कार्यालयास पाठविणे. |
| दिनांक १७/०२/२०१८ ते ३०/०३/२०१८ | पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती अर्जांची तपासणी व कार्यवाही |
| दिनांक ०१/०४/२०१८ ते १५/०४/२०१८ | पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ ची बैठक व आदेश |
| दिनांक १५/०४/२०१८ ते ३०/०४/२०१८ | बदली झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रितसर कार्यभार हस्तांतर करुन त्यांना कार्यमुक्त करणे. |
| दिनांक ०१/०५/२०१८ ते १५/०५/२०१८ | सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी कर्तव्यांवर हजर होणे, व संबंधीत घटकांनी या कार्यालयास अनुपालन अहवाल पाठविणे. |
| दिनांक ३१/०५/२०१८ | कर्तव्यावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांना ज्ञापन देवून हजर न झाल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी कळविणे.<br>दिनांक ३१/०५/२०१८ नतंर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, पो.म.सं. कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून स्थिगिती आदेशंव्यतिरिक्त इतर सर्व अधिकाऱ्यांना स्थित कार्यमुक्त करुन दि. ०१/०६/२०१८ नंतर त्यांचे वेतन सध्याच्या घटकात काढण्यात येवू नये. |

५) बदलीबाबत विनंती करण्यासाठी कोणीही पोलीस अधिकारी पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यास येणार नाही. बदली झाल्यानतंर जोपर्यत बदलीच्या ठिकाणी ते हजर होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या कोणत्याही विनंतीचा विचार करण्यात येणार नाही. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होऊनच विनंतीसाठी नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने, व त्यांच्या अभिप्रायांसह अर्ज सादर करावेत. नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने सादर न केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. बदली पुनर्विलोकनाबाबत नंतर कळविण्यात येईल.

६) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २(६A) नुसार पोलीस अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी एप्रिल महिन्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस